दिनांक ०७/०६/२०२३

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ७/०६/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा.

### दुखापत

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. बडनेरा अप क्र ४२०/२०२३ कलम ३२५,५०४, ५०६, भा. द. वी. | **चमन नगर नवी वस्ती बडनेरा** | **दि ०१/०५/२०२३ चे १५/.००**<br><br>**दाखल दि ०७/०६/२०२३ चे ०१.०१ वा** | **अब्दुल गफफार अब्दुल कादर वय ६० वर्ष रा. रजा नगर नवी वस्ती बडनेरा** | **अब्दुल आरीफ अब्दुल युसुफ वय ४० रा. लालखडी अम. २) इम्रान अब्दुल गफार वय २० वर्ष ३) रिहान अब्दुल गफ्फार वय १८ वर्ष दोन्ही रा. चमन नगर ४) अब्दुल रफिक अब्दुल युसुफ वय ३० वर्ष रा. लालखडी अमरावती.** | **हकीकत अशा प्रकारे आहे की फि. नामे अब्दुल गफफार अब्दुल कादर वय ६० वर्ष रा. रजा नगर नवी वस्ती बडनेरा मी समक्ष पो. स्टे.ला येवुन रिपोर्ट देते की वरिल पत्तावर राहते. व ऑटो चालवतो. नातेवाईक अब्दुल आरीफ अब्दुल ुसुफ मी त्याना म्हटले की मुलाचे एका वर्षानी लग्न करा तर या कारणावरुन मला नातेवाईक यांनी मला शिवीगाळ करुन लाथाबुक्यानी मारले तसेच लाकडी काठीने उजव्या हाताला मारले म्हणुन मी ईलाजा करिता खाजगी दवाखाण्यात गेलो. माझे जवळ पैसे नसल्यामुळे मी. दि. ०९/०५/२३ रो. इर्विन दवाखाना येथे उपचार घेतला मला दि. १४/०५/२३ रो. सुटटी झाली त्यानतर माझी प्रकृती ठिक नसल्यामुळे मी आज रो. पो. स्टे.येवुन योग्य ती कारवाई व्हावी करिता रिपोर्ट देत आहे.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरजा गुन्हा दाखल केला.** |
| २ | **पो.स्टे. गाडगे नगर अप.क्र. ७७९/२०२३ कलम ३२४,२७९, ३३७,१४३, १४७,१४८, १४९ भा.द.वि.** | **रिंगरोड कठोरा बायपास अमरावती** | दि. ०६.०६.२३ चे १६.००वा दरम्यान<br><br>दि. ०७.०६.२३ चे ०१.३५ वा | गोविंदा शिवराम शिंदे वय ६५ वर्ाष. रा सारगाव काळे ता नेर, जि.यवतमाळ ह.मु. रिंगरोड कठोरा बायपास अम. | मो.सा.चालक व त्याने बोलविलेले ५ ते ७ लोक | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिहे पानठेल्यावर बिडीबंडल आणण्याकरीता जात असताना रहाटगाव कडुन मो.सा. भरधाव वेगाने आली व फि.ला धडक दिली त्यामुळे फि. रोडवर पडले .फि.चे उजवे डोळ्याजवळ डावे हाताला व डावे खांद्याला मार लागला. फि.पडल्याने पाल टाकुण राहणारे शेजारी नातेवाईक धावुन आले व नातेवाईक व आरोपी यांच्यासोबत वादवादी झाली त्यानंतर मो. सायकल लोकांनी तेथे ५ ते ७ लोकांना बोलविले व ते सर्व लोक आमचे पाल येथे आले व फि.चे नातेवाईका लोकांना मारहाण करु लागले त्यांनी फि.चे राहत असलेल्या ठिकाणी धिंगाना घातला. अशा फि.चे जबानी रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **३** | पो. स्टे. राजापेठ अप क्र.५४१/२०२३ कलम ३२४, ५०४, ५०६ भा. द. वि | **रवि नगर अमरावती** | **दि.06/06/2023 चे 20/00वा. दरम्यान**<br><br>**दा. ता. वेळ**<br><br>**दि.07/06/2023 चे 00.57 वा** | राहुन गजाननराव अजबे वय 21 वर्ष रा. जयगुरु नगर अमरावती | संस्कार सतीष शर्मा वय 22 वर्ष रा. रवि नगर अमरावती | **हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादीस आरोपीच्या घरा जवळ बोलावुन क्रीकेट सट्याचे उधारीचे पैसे मागीतले असता फिर्यादीने पैसे सध्या नसल्याचे म्हटल्याने आरोपीने फिर्यादीस पाईपने व लाथ्थाबुक्यांनी मारहान करुन शिवागाऴ केली व मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन व मेटी. सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |

## वाहन चोरी

| **अ.क्र.** | **पो.ठाणे अप.क्र. व कलम** | **घटना स्थळ** | **गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ** | **फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र.** | **आरोपीचे नाव व पत्ता** | **हकीकत** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **४** | **५** | **६** | **७** | **१०** |
| **१** | पो. स्टे. राजापेठ अप क्र.५४२/२०२३ कलम ३७९ भाद. वि | **बालाजी प्लॉट पन्नालाल नगर येथे शुभम सुरेश बैद्य यांच्या घरा जवळ अमरावती** | **दि.06/06/2023 चे 13/00वा. दरम्यान**<br><br>**दा. ता. वेळ**<br><br>**दि.07/06/2023 चे 12.29 वा** | ऋषीकेश अर्जुन भळे वय 22 वर्ष रा. विलास नगर अमरावती | अज्ञात | **हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांची मोपट TVS जुपीटर नेव्ही ब्युल रंगाची क्र. MH-27-DB-9514 चेचीस क्र. MD626CG51M1G37968 इंजेन क्र. DG5GM1815612 कि. अ. 7,000/-ु बॉंलाजी प्लॉट पन्नालाल नगर येथे शुभम सुरेश बैद्य यांच्या कडे कामाला आला व गाडी बाजुला पार्क करुन गेला नास्ता करण्यासाठी जाण्या करीता गाडी जवळ आसा असता त्याला त्याची गाडी दिसुन आली नाही आजु बाजुला शोध घेतला मिळुन आली नाही अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |

## जबरी चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. गाडगे नगर अप.क्र. ७८०/२३ कलम ३९४, ३४ भा.द.वि. | कठोरा जकात नाका रोड अमरावती | दि. ०६.०६.२३ चे १८.३० वा<br><br>दि. ०७.०६.२३ चे ०२.१० वा | सज्जु शबीर खाँ. सौदागर वय २४ वर्ष.रा. मु.पो. नादुरा ता.पो.स्टे.अमरावती | जकात नाका येथील बेड्यातील राणारे ३ ते ४ लोक, १) शंकर रवि ठाकरे वय ३८ वर्ष रा. ठाणापुर ता.कारंजा जि.वाशिम | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.हे दि. २४.०५.२३ रोजी घरातील ११५ कट्टे सोयाबीन पोते विक्री करुन त्याचे पैसे २,७१,३८१ रु घेवुन बुलेट मो. सायकल क्र. एम.एच ४९-बीएप-३३३१ ला पैशाची थैली टांगुन घराकडे जकात नाका चौकातुन येत असताना सिग्नल सुटल्यावर पोटे टाऊनशिप कडे जाणा-या रोडने येत असातने एक म्हतारा मो.सा. समोर आला त्यामुळे फि.ने मो.सा. चे ब्रेक दाबुन मो. सा. थांबविली त्यामुळे फि.हे मोटरसायकल सह खाली पडले. मो.सा. समोर आलेला म्हातारा माणुन भितीने मागेपुढे करताना दचकल्याने रोडचे बाजुला पडला तेव्हा तेथे बेड्यातील काही म्हाता-या काही नातेवाईक लोक तेथे आले व त्यातील ३ ते ४ लोकांनी फि.ला हाथबुक्यांनी मारहाण करुन अंगातील शर्ट फाडले व गळयातील जुना वापरता २५ ग्रम वजना चा गोफ कि.अं. १,००,०००/- रु. तसेच मो.सा. च्या हण्डलचा असेलली २,७१,३८१ रु. असलेली थैली काढुन घेवुन गेले . त्यानंतर फि.ला मारझोड करुन एकुण ३, ७१, ३८१ चा माल हिसकावुन घेवुन गेले. अशा फि.चे ज. रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो. स्टे. राजापेठ अप क्र.५३९/२० २३ कलम ३७९ भादवी | **गद्रे चौक राजापेठ अमरावती** | **दि.06/06/2023 चे 19/10 वा. दरम्यान**<br><br>**दा. ता. वेळ**<br><br>**दि.07/06/2023 चे 00.10 वा**<br><br>**.** | उमेश पंजाबराव साखरे वय 35 वर्ष धंदा शिक्षक रा. शिवाजी नगर मुर्तीजापुर जि. अकोल ा | अज्ञात | **हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याची कार क्र. MH-29-N-9858 ने पालेकर बेकरी मध्ये गेले व गाडीच समोरचे दार अनावधान उघडे रहील व 10 मिनींटानी परत गाडी जवळ आले असतो अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून DO आदेशाने सदरचा गुन्हा दाखल केला.** |

## अपघात

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे. बडनेरा अप क्र ४२१/२०२३ कलम २७९, ३३७ भा. द. वी. | गांधी विध्यालय जवळ जुनी वस्ती बडनेरा. | घ.ता.वेळ - दि. ०३/०६/२०२३ चे २०/३० वा.<br><br>दाखल ता. वेळ - दि. ०७/०६/२०२३ चे १३/०८ वा. | अंकुश कुपाशंकर श्रीवास वय ३७ वर्ष का. काशीराम चाळ गांधी विध्यालय जवळ जुनी वस्ती बडनेरा. | ऑटो क्र. MH ३४BH २००७ चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की अंकुश कुपाशंकर श्रीवास वय ३७ वर्ष का. काशीराम चाळ गांधी विध्यालय जवळ जुनी वस्ती बडनेरा. मी पो. स्टे.ला येवुन रिपोर्ट देत की , मी वर नमुद पत्यावर राहतो व मजुरीते काम करतो. दि. ३/०६/२३ रो. रात्री ०८/३० वा. दरम्यान काम करुन रोड क्रास करुन गांधी विद्यालय कडुन पायदळ घरी जात असताना बडनेरा जुनी वस्ती कडुन एक ऑटो भरधाव वेगाने येवुन मला ठोस मारुन जखमी करुन पळुन गेला . नी मीत्राचे मदतीने पो.स्टेशन बडनेरा येथे येवुन पो. स्टे.ला न जाता सरळ इर्विन दवाखाना अम. येथे गेलो व तिथे पोलीसानी माझे बयान घेतले व मी त्याना ऑटो क्र. माहित नाही. असे सागितले आज मला सुटटी झाली आहे. तर माझा मित्र दुर्गेस बसदेव चतुरकार यांनी नंबर सागितले वरुन मी आज रो.सदर ऑटो चालका विरुध्द भरधाव वेगाने व निष्काळजीपनाने चालवुन मला जखमी करुन पळुन गेला त्याचे विरुध्द रिपोर्ट देत आहे.अशा फि. चे जबावी रि.वरुन व मेडीकल रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## ईतर

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| 1 | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर<br><br>अप क्र ४०५/२०२३ कलम ७,७(A),१२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ | महक कोल्ड्रींकस पानठेला, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समीती कार्यालय अमरावती च्या समोर | दि. ०६/०६/२०२३ चे १४.३४ वा ते १५.२० वा दरम्याण<br><br>दा ता वेळ दि.०७/०६/२०२३ चे ०२.४१ वा. | संजय ओंकार गजाम वय ३० वर्ष व्यवसाय नोकरी कोतवाल, रा हातोंडा ता अंजनगावसुर्जी जि अमरावती | १.दयानंद राजासिंग डिक्का वय ३४ वर्ष पद सफाई कामगार, नेमणुक शासकिय माध्यमिक आश्रम शाळा, टिटंबा,ता धारणी जि अमरावती सद्ध्या नेमणुक सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसुचित जमाती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि चे कोतवाल पदावर लागल्यानंतर त्यांनी जात वैधताप्रमाणपत्र करीता अर्ज केला होता त्यानंतर सदर जातवैधता प्रकरण तहसील कार्यालय अंजनगावसुर्जी यांनी संपुर्ण कागदपत्र पडताळणी करीता अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय अमरावती येथे अंदाजे २ महिन्यापुर्वी पाठविले आहे. दि.२३/०५/२०२३ रोजी फि त्यांच्या जातवैधता प्रमाणपत्राच्या पाठपुरावा करण्याकरीता अमरावती येथील कार्यालय गेलो असता त्या ठिकाणी येथील कर्मचारी श्री दयानंद डिक्का यांना भेटले व फिने त्यांच्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत विचारपुस केली असता कर्मचारी सदानंद डिक्का यांनी फि ला जात वैधता प्रमाणपत्र मिळवुन देण्याकरीता १०,०००/-रु ची मागणी केली फि ने त्यांना माझ्याकडे येवढे पैसे नाही व पैसे देण्याची माझी परिस्थिती नाही असे म्हटल्यावर अरोपीने "पैसे दिल्याशिवाय तुझे काम साहेब करणार नाही , पैसे दे लवकर मी तुझ काम करुन देतो" असे म्हटले त्यावेळी फि ची ईच्छा नसतानाही नाईलाजास्तव फोन पे ने कर्मचारी श्री डिक्का याला त्याचे मो क्र वर ८००/-रु पाठवले व राहीलेले पैसे पगार झाल्यावर जुन महिन्यात देतो असे सांगितले. तरी जात पडताळणी समिती कार्यालय अमरावती येथील कर्मचारी दयानंद डिक्क्का यांच्या विरोधात तक्रार असुन त्याचेवर कायदेशिर कारवाई व्हावी अशा तक्रारीवरुन तक्रार टंकलीखीत करण्यात आली व त्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने पो नि मांजरे सा यांनी सांगितले की, आलोसे हे खरच लाच रक्कम मागणी करीत आहे किंवा नाही याबाबत पडताळणी कार्यवाही करण्याचे सांगितले वरुन आलोसे हे कार्यालयात हजर आहेत किंवा नाही याबाबत फि ला खात्री करण्याचे सांगितले परंतु फि ने फोन द्वारे विचारपुस केली असता श्री |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जुना बायपास अमरावती | | | प्रमाणपत्र पडताळणी समीती कार्यालय अमरावती रा. दत्तवाडी जुनी वस्ती बडनेरा अमरावती<br>२.सय्यद अन्सार लतीफ वय ३२ वर्ष धंदा-पानटपरी चालक रा.चपराशीपुरा अमरावती | दयानंद डिक्का हे कार्यालयात हजर नसुन बाहेर गावी आहे असल्याचे त्यांनी सांगितले व उद्या दि.०६/०६/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा चे सूमारास भेटण्यास बोलाविले वरुन दि.०६/०६/२०२३ राजी कार्यालयात आहेत का याबाबत खात्री करण्याकरीता फोनद्वारे माहिती घेतली असता श्री दयानंद डिक्क्का यांनी १२.०० वा ऑफिस ला या असे सांगितले. त्यांनतर अंदाजे १२.०० वा सुमारास फि जवळ व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन भेटण्याकरीता रवाना केले. त्या ठिकाणी पोहचल्यावर श्री दयानंद डिक्क्का यांना फोन लावला त्यांनी फि ला जिल्हाधिकारी कार्यालय अमराती च्या गेट समोर भेटण्याकरीता बोलाविले तेव्हा फि व पंच क्र १ असे जिल्हाधिकारी कार्यालय गेट समोर गेले व तेथे श्री दयानंद डिक्का यांना भेटले त्यांनी फि ला जातपडताळणी प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळुन देण्याकरीता तडजोडीअंती ८,०००/-रु लालेची मागणी क रुन आता किती आहे असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवली त्यानंतर फि ने त्यांना काहीवेळाने पैसे आणुन देतो असे म्हटले व पंच क्र १ यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे गेले व घडलेली हकीकत सांगितली . त्यानंतर फि ला संपुर्ण तयारीसह लाच रक्कमेला ॲन्थ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम फि चे शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली व व्हॉईस रेकॉडर सुरु करुन देवुन फिला पंच क्र १ सहअनुसुचित जमाती जातपडताळणी कार्यालय अमरावती येथे रवाना केले. फि चे पाठोपाठ सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे खाजगी वाहनाने जातपडताळणी कार्यालय जवळ येवुन कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर फि व पंच क्र १ असे कार्यालयाच्या बाहेर असलेले मेहक कोल्ड्रींक्स पानसेंटर जवळ श्री दयानंद डिक्का यांना भेटले असता श्री दयानंद डिक्का यांनी तडजोडीअंती मागितलेली ८०००/-रु ची लाच रक्कम पानठेला चालक सय्यद अन्सार यांचेकडे देण्यास सांगुन श्री डिक्का हे कार्यालयाकडे निघुन गेले. त्यानंतर फि ने सदर लाच रक्कम पानठेला चालक सय्यद अन्सार यांना दिली व लागलिच लाच रक्कम स्विकारण्याचा नियोजित इशारा केला.त्यावेळी फि जवळ मांजरे साहेब, पाटील साहेब, पंच क्र २ , श्री राठोड तसेच सापळा पथकातील सर्व स्टाफ त्याठिकाणी आले व त्यांनी अन्सारी यांना ताब्यात घेतले.तेव्हा लगेश पाटील साहेब व सापळा पथकातील काही स्टाफ यांनी अनुसुचित जमाती पडताळणी कार्यालयात जावुन श्री दयानंद डिक्का यांना ताब्यात घेवुन मेहक पानसेंटर या ठिकाणी आणले त्यावेळी मांजरे सा यांनी श्री डिक्का व सय्यद यांना सापळा पथकातील कर्मचारी यांचा परिचय करुन दिला.<br>श्री डिक्का यांनी अनुसुचित जात पडताळणी कार्यालय बाहेर असलेले मेहक पानसेंटर चे चालक सय्यद अन्सार सय्यद लतीफ यांचेकडे देण्यास सांगितले वरुन दि.०६/०६/२०२३ रोजी अंदाजे १४.३४ वा ते १५.२० वा दरम्याण पानठेला चालक अन्सार यांनी पंचासमक्ष लाच रक्कम ८,०००/-रु स्विकारल्याने त्यांचे विरुद्ध फि ने कायदेशिर फिर्यादी दिली वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| २ | पो स्टे फ्रेजरपुरा<br><br>अप क्र ४०४/२३ कलम २८५भादवि | अमरावती | दि. ०६/०६/२०२३ चे २१.०० वा<br><br>दि.०७/०६/२०२३ चे ०२.११ वा | सरतर्फे सुनिल मानिकराव सोळंके ब नं २८९, पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि यांची दि.०६/०६/२०२३ रोजी चे २१.०० वा ते दि.०७/०६/२०२३ चे ०९.०० वा पावेतो पो स्टे हद्दीत पो स्टाफ सह पेट्रोलींग ड्युटी असताना संजय गांधी नगर गेट चे समोर २१.२०वा एक महिला चालकाने तिच्या ताब्यातील हॉटेलसमोरील हातगाडीवर अंडाभुर्जी ऑमलेट बनविण्यासाठी स्फोटक पदार्थ सार्वजनिक रस्त्यावर येणा-या जाणा-या लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने वापरताना दिसुन आली . वरुन तीला पंचासमक्ष ताब्यात घेवुन तीला तीचे नाव विचारले असता तीने आपले नाव उषा संभाजी कापसे वय ५० वर्ष रा. संजय गांधी नगर नं १ अमरावती असे सांगितले वरुन सदर आोपीचे कृत्य हे कलम २८५ भादवि प्रमाणे होत असल्याने तिचे विरुद्ध फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| 3 | **नांदगावपेठ अप क्र २०९/२३ कलम १३६ भारतीय विद्युत कायदा २००३** | **अमरावती** | दि.०६/०६/२०२३ चे ००/०० वा.दि.०७/०६/२०२३ चे ०५/०० वा.दा.ता.वेळ दि.०७/०६/२०२३ चे १३/१७ | **एक महीला** | **अत्रात इसम** | **हकीकत अशा प्रकारे आहे की,दि.३१/०५/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा वरिष्ठ तंत्रज्ञ शेदोळा बु यांनी फोन द्ववारे माहीती दिली की,शेदोळा बु.गावातील श्री प्रमोद तसरे यांचे शेतातील कृषी पंपाची बेलसरे यांचे शेतातील रोहीत्रावरील म.रा.वि.वि.कंम्पनीचे कृषी वाहीणीचे एकुण १० खंब्यावरील अल्युमिनिअम वायर २ कि.मी.ची अंदाजे ५०,००० रु.किमतीची कोणीतरी अज्ञात चोराने चोराने तार कापुन चोरुन नेऊन महावितरण कंम्पनीचे नुकसान केले.सदर चोरीची घटना हि.दि.३०/०५/२०२३ चे रात्री ००/०० वा. ते दि.३१/०५/२०२३ चे ०५ वा.दरम्यान ची आहे अशा फि.्च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वा. | | | |
| ४ | पो. स्टे. राजापेठ अप क्र.५४०/२०२३ कलम ७.लॉटरी अधिनियम<br><br>सह कलम ४, ५. मा. जु. कायदा. | **राजश्री ॲटोमोबाईल लॉटरी सेन्टर सुतगीरणी रोड समोर गोपाल नगर अमरावती** | **दि.06/06/2023 चे 19/30वा. दरम्यान**<br><br>**दा. ता. वेळ**<br><br>**दि.07/06/2023 चे 00.20 वा**<br><br>**.** | पोउपनि गंगाधर जाधव पो. स्टे. राजापेठ अमरावती शहर | 1)देवानंद अशोकराव अतकरे वय 40 वर्ष रा. चिमोटे लेआउट अमरावती 2)अनिकेत अनंत तीवारी वय 22 वर्ष रा. चिमोटे लेआउट अमरावती 3) भगनाव गणेशप्रसाद तीवारी वय 45 वर्ष रा. भाजीबाजार अमरावती | **हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी स्टॉप सह मिळालेल्या माहीती वरुन नमुद घटणास्थळी मुळ मालक आरोपी क्र. 1 व 2 यांच्या कडे विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की सदर लॉटरी ही मुळची अरुणाचल प्रदेश (ईटानगर) येथील आहे सदरची लॉटरी माहाराष्ट्रात चालविण्यासाठी महाराष्ट्र सरकार / केन्द्र सरकार यांची परवानगी बाबत विचारले असता त्यांनी तशी कुढलीच परवानगी आमचे समक्ष सादर केली नाही महाराष्ट्रात परवानगी नसतांना वर नमुद आरोपीतांनी पैसे लावुन लॉटरीवर हारजीतचा खेळ खेळतांना मिळुन आले तरी नमुद घटणास्थळा वरुन जप्ती पंचनाम्या प्रमाणे मुद्दे माल जप्त करण्यात आला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |

## अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना वेळ व दाखल वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा मर्ग क्र. ३८/२०२३ कलम १७४जाफौ | अमरावती | दि.०७/०६/२०२३ चे ०६.३० वा दरम्याण<br><br>दा ता वेळ<br><br>दि.०७/०६/२०२३ चे ११.४८वा. | हरीदास किसनराव सुरजुसे वय ५७ वर्ष रा. भोईपुरा वडाळी राम मंदिराजवळ अमरावती | एक महीला | राहते घरी गळफास | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांचे नातेवाईक हे दारु पिण्याच्या सवईचे होते ते रोज दारु पिवुन येत असत व स्वतः बडबड करत परंतु कधी भांडण किंवा मारझोड केली नाही, फी चे नातेवाईक कधी तरी छोटया मोठया कामावर जात होते पण पैसे घरी देत नव्हते, दि.०७/०६/२०२३ रोजी पहाटे अजान झाल्यानंतर फि उठली व कुलर व फॅन खराब झाल्यामुळे फि व तीचे नातेवाईक रात्री बाहेर झोपले होते व मुलगा शेजारच्या घरी झोपायला गेला होता. फि व त्यांचे नातेवाईक मध्ये कोणताही वाद भांडण झालेले नव्हते,सकाळी फि ने उठल्यावर झाडझुड केली व फि चे नातेवाईक थोडयावेळाने उठले व संडासला जावुन आले व बसले, घरी सकाळी नळ न आल्याने फि घराजवळील हापसीवर पाणी भरायला गेली व हापसीवर गर्दी असल्याने घरी यायला थोडा वेळ झाला व अंदाजे ०६.३० वा फि घरी गेली तर फि ला तीचे नातेवाईक | मपोउपनि भारती मामनकर , पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | किचनमध्ये दोरीने लटकलेले दिसले फि जोरजोराने ओरडल्याने येटाळयातील लोक जमले व मुलगा पन उठुन घरी आला त्याने पोलीसांना माहिती दिली . फि चे नातेवाईक दारु पिण्याच्या सवईचे होते त्यांना कोणताही आजार नव्हता अश फि चे जबाणी रिपोट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. | |

## प्रोव्हीशन रेड

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर** | अप क्र ४०६/२०२३ कलम ६५ (E) म दा का | यशोदा नगर पेट्रोल पंप जवळ अमरावती | दि.०६/०६/२०२३ चे २२.३०वा | दि.०७/०६/२०२३ चे ०३.१८ वा | सरतर्फे पोहेकॉ सुनिम मानिकराव सोळंके ब नं २८९, पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | करण गोविंदराव जाधव वय ३० रा गजानन नगर बिच्छु टेकडी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि यांची दि.०६/०६/२०२३ रोजी चे २१.०० वा ते दि.०७/०६/२०२३ चे ०९.०० वा पावेतो पो स्टे हद्दीत पो स्टाफ सह पेट्रोलींग ड्युटी असताना २२.३० वा सुमारास यशोदा नगर चौकामध्ये गोपनिय माहिती मिळाली की, यशोदा न गर चौक येथील पेट्रोलपंप जवळ एक इसम हा लोकांना अवैदय रित्या दारु विक्री करत आहेअशा माहिती वरुन दोन पंचांना बोलावुन प्रोव्ही रेड करणे कामी पंचांना माहिती दिली. त्यानंतर पंच व आम्ही पो स्टाफ सह सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता एक इसम हातामध्ये असलेली कापडी पिशवीमधुन लोकांना दारु विक्री करताना दिसुन आला वरुन पंचासमक्ष त्यास ताब्यात घेतले व त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव करण गोविंदराव जाधव वय ३० रा गजानन नगर बिच्छु टेकडी अमरावती असे सांगितले व त्याचेजवळुन २१ नग १८० एम एल च्या देशी दारु संत्रा बॉबी च्या पावटया किं १४७०/-रु प्रोव्ही चा मुद्देमाल जप्ती पंचनाम्याप्रमाणे मिळुन आला अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |